**L. A. BILL No. XXIII OF 2025.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA STAMP ACT.

**सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक २३.**

## महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.

१९५८ चा ६०. **ज्याअर्थी**, यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) अधिनियम, २०२५, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन १९५८ चा अधिनियम क्रमांक ६० याच्या कलम ४ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम (यात यापुढे ज्याचा निर्देश, “मुख्य अधिनियम” असा केला आहे) याच्या कलम ४ मध्ये, पोट-कलम (१) मधील, “शंभर रुपये” या मजकुराऐवजी, “पाचशे रुपये” हा मजकूर दाखल करण्यात येईल.

१९५८ चा ६०.

सन १९५८ चा अधिनियम क्रमांक ६० याच्या कलम १० ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम १० मध्ये,—

(१) पोट-कलम (३) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

“(३) (अ) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, अनुसूची एक मधील संलेख, ज्यांच्याबाबतीत उक्त अनुसूचीच्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे आकारणीयोग्य असलेले शुल्क,—

(एक) फ्रँकिंग यंत्राद्वारे; किंवा

(दोन) शासकीय पावती लेखांकन प्रणालीमार्फत (जी.आर.ए.एस.) आभासी कोषागारात किंवा कोणत्याही परवानगीयोग्य नेट बँकिंग पद्धतीने, याबाबतीत उक्त प्राधिकाऱ्याने **शासकीय राजपत्रात** विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही बँक खात्यात, ई-प्रदानाद्वारे,

प्रदान करण्यात येईल ते संलेख, विनिर्दिष्ट करील.

(ब) ई-प्रदानाद्वारे, प्रदान केलेले कोणतेही शुल्क,—

(एक) या प्रयोजनासाठी, मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकाऱ्याने यथोचितरीत्या अधिसूचित केलेल्या समुचित अधिकाऱ्याने त्या संलेखावर केलेल्या तशा अर्थाच्या पृष्ठांकनाद्वारे; किंवा

(दोन) अशा संलेखांशी संबंधित असणाऱ्या इलेक्ट्रॉनिक अभिलेखासाठी एकत्रित प्रदानाच्या बाबतीत, अशा समुचित अधिकाऱ्याने दिलेल्या प्रमाणपत्राद्वारे; किंवा

(तीन) मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकाऱ्याकडून विहित करण्यात येईल अशा इलेक्ट्रॉनिक साधनांद्वारे व पद्धतीने दिलेल्या ई-मुद्रांक प्रमाणपत्राद्वारे,

दर्शविण्यात येईल.

(क) जर समुचित अधिकाऱ्याने, खंड (ब) अन्वये संलेख पृष्ठांकित केला नसेल किंवा प्रमाणपत्र दिले नसेल, किंवा यथास्थिति, विहित केलेल्या इलेक्ट्रॉनिक साधनांद्वारे व पद्धतीने ई-मुद्रांक प्रमाणपत्र दिलेले नसेल तर, खंड (अ) खालील केवळ ई-प्रदान हे, या अधिनियमाच्या प्रयोजनांपैकी कोणत्याही प्रयोजनासाठी प्रदान केलेले शुल्क म्हणून समजले जाणार नाही.

(ड) ई-प्रदानाचा वापर, योग्य अधिकाऱ्याने करावयाचे पृष्ठांकन किंवा प्रमाणन आणि ई-मुद्रांक प्रमाणपत्र तयार करणे यांचे नियमन करण्याची कार्यपद्धती, मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी, आदेशाद्वारे निर्धारित करील अशी असेल.”;

(२) पोट-कलम (३अ) वगळण्यात येईल;

(३) पोट-कलम (४) मधील,—

(एक) “केलेले पृष्ठांकन” या मजकुरानंतर, “, दिलेले प्रमाणपत्र किंवा तयार केलेले ई-मुद्रांक प्रमाणपत्र” हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल;

(दोन) “त्या पृष्ठांकनामध्ये” या मजकुरानंतर, “, प्रमाणपत्रामध्ये किंवा ई-मुद्रांक प्रमाणपत्रामध्ये” हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

सन १९५८ चा अधिनियम क्रमांक ६० याच्या कलम १०ड ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम १०ड मध्ये,—

(१) पोट-कलम (३) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

"(३) चलान विरुपित केल्यानंतर, संलेखावर पुढीलप्रमाणे पृष्ठांकन करणे हे, पोट-कलम (२) अन्वये अशा प्रकारे प्राधिकृत केलेल्या समुचित अधिकाऱ्याचे कर्तव्य असेल :—

"जीआरएन क्रमांक...................., सीआयएन..................., दिनांक ............. अन्वये ई-चलनाद्वारे रुपये................... इतके मुद्रांक शुल्क प्रदान केले.

कार्यालयाची मोहोर.                                        अधिकाऱ्याची स्वाक्षरी."";

(२) परंतुकामधील, "कोषागार पावती" या मजकुरानंतर, "(ई-एस बी टी आर) किंवा पोट-कलम (३) अन्वये तयार केलेले ई-मुद्रांक प्रमाणपत्र" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

सन १९५८ चा अधिनियम क्रमांक ६० याच्या कलम ३१ ची सुधारणा.

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३१ मध्ये,—

(१) पोट-कलम (१) मधील, "शंभर रुपये इतके शुल्क" या मजकुराऐवजी, "एक हजार रुपये इतके शुल्क" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(२) पोट-कलम (१) नंतर, पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईल :—

२०२५ चा महा. .

"परंतु, महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) अधिनियम, २०२५ याच्या प्रारंभानंतर निष्पादित केलेल्या संलेखांच्या बाबतीत, व्यक्तीने,—

(एक) जेव्हा, जी मालमत्ता अशा संलेखांचा विषय असेल त्या मालमत्तेच्या बाजारमूल्यावर मुद्रांक शुल्क आकारणीयोग्य असेल तेव्हा, संलेखात नमूद केलेल्या प्रतिफलाचे मूल्य किंवा अशा व्यक्तीच्या मते, अशा मालमत्तेचे बाजारमूल्य यानुसार आकारणीयोग्य असलेले मुद्रांक शुल्क,- यांपैकी जे अधिक असेल ते आणि संलेखांवर आधीच प्रदान केलेले मुद्रांक शुल्क यातील फरकाची रक्कम;

(दोन) अन्य प्रकरणी, व्यक्तीच्या मते आकारणीयोग्य असलेले मुद्रांक शुल्क आणि संलेखांवर आधीच प्रदान केलेले मुद्रांक शुल्क यांमधील फरकाची रक्कम,

जिल्हाधिकाऱ्याकडे जमा केल्याशिवाय, कोणताही अर्ज, अभिनिर्णयासाठी स्वीकारण्यात येणार नाही :

परंतु आणखी असे की, जिल्हाधिकारी, अशी जमा केलेली रक्कम, अंतिमतः निर्धारित केलेल्या मुद्रांक शुल्कापोटी समायोजित करील, आणि जमा केलेली अधिकची रक्कम, कोणतीही असल्यास, कोणत्याही व्याजाशिवाय, ती जमा करणाऱ्या व्यक्तीस, पंचेचाळीस दिवसांच्या कालावधीत, परत करील.".

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

वित्तीय वर्ष, २०२५-२०२६ च्या अर्थसंकल्पीय भाषणामध्ये अंतर्भूत असलेले प्रस्ताव अंमलात आणण्याच्या दृष्टीने, महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम (१९५८ चा ६०) यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे असे शासनास वाटते.

२. महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमात (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुद्रांक अधिनियम" असा केला आहे) प्रस्तावित केलेल्या सुधारणा खालीलप्रमाणे आहेत :—

(एक) पूरक दस्तऐवजांच्या बाबतीत, जर व्यवहार पूर्ण करण्यासाठी एकापेक्षा अधिक दस्तऐवज वापरले जात असतील तर, दीर्घ काळापासून निश्चित केलेली मुद्रांक शुल्काची शंभर रुपये इतकी नाममात्र रक्कम, पाचशे रुपये इतकी वाढविण्याच्या दृष्टीने, मुद्रांक अधिनियमाच्या कलम ४ मध्ये सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले आहे.

(दोन) लोकांना, कोणत्याही ठिकाणाहून कोणत्याही वेळी ऑनलाइन मुद्रांक शुल्क प्रदान करणे शक्य व्हावे यासाठी, राज्य शासनाच्या कोषागारात प्रदान (ई-प्रदान) आणि "ई-मुद्रांक प्रमाणपत्रा" ची एक नवीन तरतूद असलेले "मुद्रांक शुल्क प्रमाणपत्र" यासाठी ऑनलाईन पद्धती करणे सुलभ व्हावे या दृष्टीने, मुद्रांक अधिनियमाची कलमे १० व १०ड यांमध्ये सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले आहे.

(तीन) संलेखाच्या शुल्क पात्रतेबाबत जिल्हाधिकाऱ्यांचे मत घेण्यासाठी अर्ज करण्याच्या आभिनिर्णय शुल्कात १०० रुपयांवरून १००० रुपये इतकी वाढ करण्याच्या आणि निष्पादित केलेल्या संलेखाच्या अभिनिर्णयासाठी अर्ज दाखल करताना, त्यात विनिर्दिष्ट केलेल्या मुद्रांक शुल्काची विवक्षित रक्कम जमा करण्याची तरतूद करण्याच्या दृष्टीने, मुद्रांक अधिनियमाच्या कलम ३१ च्या पोट-कलम (१) मध्ये सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले आहे.

३. वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक १७ मार्च, २०२५.

**चंद्रशेखर बावनकुळे,**
महसूल मंत्री.

## वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे ज्ञापन

या विधेयकात, वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे पुढील प्रस्ताव अंतर्भूत आहेत :—

**खंड ३(१).—** महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या कलम १० च्या विद्यमान पोट-कलम (३) ऐवजी दाखल करण्याचा हेतू असलेल्या या खंडान्वये,—

(एक) खंड (अ) मध्ये, अनुसूची एक मधील संलेख, ज्यांच्याबाबतीत उक्त अनुसूचीच्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे आकारणीयोग्य असलेले शुल्क, फ्रँकिंग यंत्राद्वारे किंवा शासकीय पावती लेखांकन प्रणालीमार्फत (जी. आर.ए.एस.) आभासी कोषागारात किंवा कोणत्याही बँक खात्यात, ई-प्रदानाद्वारे, प्रदान करण्यात येईल ते संलेख, विनिर्दिष्ट करण्याचा अधिकार, मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी यांच्याकडे घेण्यात आला आहे ;

(दोन) खंड (ब) मध्ये, ज्यामार्फत शुल्क ई-प्रदान करण्यासाठी ई-मुद्रांक प्रमाणपत्र तयार करता येईल ती इलेक्ट्रॉनिक साधने व पद्धत विहित करण्याचा अधिकार, मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी यांच्याकडे घेण्यात आला आहे ;

(तीन) खंड (ड) मध्ये, ई-प्रदानाचा वापर, समुचित अधिकाऱ्याने करावयाचे पृष्ठांकन किंवा प्रमाणन आणि ई-मुद्रांक प्रमाणपत्र तयार करणे यांचे नियमन करण्याची कार्यपद्धती, आदेशाद्वारे निर्धारित करण्याचा अधिकार, मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी यांच्याकडे घेण्यात आला आहे.

२. वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे वर नमूद केलेले प्रस्ताव, सामान्य स्वरूपाचे आहेत.

## वित्तीय ज्ञापन

वित्तीय वर्ष, २०२५-२०२६ च्या अर्थसंकल्पीय भाषणामध्ये अंतर्भूत असलेला प्रस्ताव अंमलात आणण्यासाठी, महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम (१९५८ चा ६०) याची कलमे ४, १०, १०ड व ३१ यांमध्ये सुधारणा करण्यासाठी विधेयक प्रस्तावित केले आहे. हे विधेयक, राज्य विधानमंडळाचा अधिनियम म्हणून अधिनियमित झाल्यावर राज्याच्या एकत्रित निधीतून करावयाच्या आवर्ती किंवा अनावर्ती खर्चाचा अंतर्भाव होईल अशी कोणतीही तरतूद, या विधेयकात नाही.

(शा.म.मु.) एचबी २९३५–२ (८४५–३-२०२५)

## भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २०७ अन्वये राज्यपालांची शिफारस

( महाराष्ट्र शासन, विधि व न्याय विभाग, आदेशाची प्रत )

भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २०७ याच्या खंड ( १ ) अन्वये महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन, ते महाराष्ट्र मुद्रांक ( सुधारणा ) विधेयक, २०२५ पुरः स्थापनार्थ घेण्याबाबत महाराष्ट्र विधानसभेस शिफारस करीत आहेत.

## सन २०२५ चे वि. स. वि. क्रमांक २३—महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) विधेयक २०२५ याचे परिशिष्ट.

### (महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, १९५८ यातील उतारे.)

### (सन १९५८ चा महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम ६० )

**१.** ते **३.** * * * *

**४.** (१) जेव्हा कोणताही विकास करार विक्री, भाडेपट्टा, गहाण किंवा संव्यवस्था यांच्या बाबतीत, व्यवहार पूर्ण करण्यासाठी अनेक संलेखांची योजना केली असेल तेव्हा, अभिहस्तांतरणपत्र, विकास करार, भाडेपट्टा, गहाण किंवा संव्यवस्था यांसाठी अनुसूची एकमध्ये विहित केलेले शुल्क फक्त प्रमुख संलेखावरच आकारण्यात येईल, आणि इतर संलेखापैकी प्रत्येक संलेखावर त्या अनुसूचित त्यासाठी जे शुल्क (कोणतेही असल्यास) विहित केले असेल त्याऐवजी शंभर रुपये शुल्क आकारण्यात येईल. विकास करार, विक्री, भाडेपट्टा, गहाण किंवा संव्यवस्था अशा एकाच व्यवहारामध्ये उपयोगात आणलेले अनेक संलेख.

(२) व (३) * * * *

**५.** ते **९.** * * * *

**१०.** (१) व (२) * * * * शुल्के कशा रीतीने भरावयाची.

(२-१-अ) ते (२-क) * * * *

(३) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, मुख्य प्राधिकाऱ्यास **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, ज्यायोगे अनुसूची एकचा स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, आकारणीपात्र असलेले शुल्क,—

(एक) फ्रँकिंग यंत्राद्वारे,

(दोन) रोखीने,

(तीन) दर्शनी धनाकर्षाद्वारे,

(चार) 'प्रदानाद्वारे; किंवा

(पाच) ई -- प्रदानाद्वारे

कोणत्याही शासकीय कोषागारात किंवा उप कोषागारात किंवा मुख्य मुद्रांक कार्यालयात किंवा, यथास्थिति शासकीय पावती लेखांकन यंत्रणेत (आभासी कोषागार) भरता येईल असे संलेख उक्त अनुसूची एकमध्ये विनिर्दिष्ट करता येतील आणि मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकाऱ्याने या प्रयोजनाकरिता, यथोचितरीत्या निर्दिष्ट केलेल्या समुचित अधिकाऱ्याने संलेखांवर केलेल्या तशा आशयाच्या पृष्ठांकनाद्वारे अशा शुल्काचे प्रदान केल्याचे दर्शविता येईल.

(३अ) ई-प्रदानाद्वारे मुद्रांक शुल्क प्रदान करण्यासाठी, शासकीय जमा लेखांकन यंत्रणेच्या (आभासी कोषागार) वापराचे विनियमन करण्याची कार्यपद्धती ही, मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी आदेशाद्वारे निर्धारित करील अशी असेल.

(४) कोणत्याही संलेखावर यथास्थिति, पोट-कलम (२-अ), (२-ब) व (२-क) याअन्वये उमटविलेला मुद्रांक किंवा पोट-कलम (३) अन्वये किंवा, कलम ३२ अ च्या पोट-कलम (२) अन्वये केलेले पृष्ठांकन हे, जणू काही, त्या उमटवलेल्या मुद्रांकनामध्ये दर्शविलेल्या किंवा यथास्थिति, त्या पृष्ठांकनामध्ये नमूद केलेल्या रकमेइतके शुल्क पोट-कलम (१) अन्वये मुद्रांकांच्या सहाय्याने अशा

संलेखाच्या संबंधात भरण्यात आलेले आहे व अशी भरलेली रक्कम पोट-कलम (१) अन्वये मुद्रांकाच्या सहाय्याने अशा संलेखावर दर्शविण्यात आली आहे अशा रीतीने त्याच प्रकारे अंमलात राहील.

**१०- अ.** ते **१०-क.** * * * *

विवक्षित विभाग, संघटना, संस्था, इत्यादींनी मुद्रांक शुल्क प्रदानाची सुनिश्तिती.

**१०ड.** (१) व (२) * * * *

(३) चलान विरुपित केल्यानंतर, संलेखांवर पुढील प्रमाणे पृष्ठांकन करणे हे, अशा प्रकारे पोट-कलम (२) अन्वये प्राधिकृत केलेल्या समुचित प्राधिकाऱ्याचे कर्तव्य असेल.

"पावती/चलान क्रमांक .............. / जीआरएन क्रमांक .............. सीआयएन .......... दिनांक ............ अन्वये रूपये ............. एवढे मुद्रांक शुल्क हे, * रोखीने / दर्शनी धनाकर्षाद्वारे/ प्रदानादेशाद्वारे / ईचलनाद्वारे भरण्यात आले.

कार्यालयाची मोहोर. अधिकाऱ्याची स्वाक्षरी.

परंतु, ज्यावेळी ई-प्रदानाची पावती घेऊन म्हणजे, ई-प्रतिभूती बँक तथा कोषागार पावती घेऊन शासकीय जमा लेखांकन यंत्रणेमार्फत मुद्रांक शुल्क भरण्यात आले असेल, त्यावेळी, पोट-कलमे (२) व (३) च्या तरतुदी लागू होणार नाहीत.

**११.** ते **३०.** * * * *

**३०अ.** * * * *

उचित मुद्रांकांबाबत अभिनिर्णय.

**३१.** (१) जेव्हा कोणताही संलेख, मग तो निष्पादित करून दिलेला असो किंवा नसो आणि तो पूर्वीच मुद्रांकित केलेला असो किंवा नसो,— त्या संलेखाच्या कोणत्याही एका पक्षकाराकडून जिल्हाधिकाऱ्याकडे आणला जाईल आणि तो आणणारी अशी व्यक्ती त्या संलेखावर किती (कोणतेही असल्यास) शुल्क आकारणीपात्र ठरेल किंवा अनुसूची एकच्या कोणत्या अनुच्छेदान्वये तो शुल्क आकारण्यास पात्र ठरेल याबाबत त्या अधिकाऱ्याचे मत घेण्यासाठी अर्ज करील आणि यथामूल्य तत्त्वानुसार मुद्रांक शुल्क अंतर्भूत असेल त्याबाबतीत, शंभर रुपये इतकी व किमान पाच रुपये व कमाल पंचवीस रुपये या रकमांच्या अधीन राहून, प्रत्येक १,००० रुपयांस किंवा त्याच्या भागास एक रुपया फी देईल तेव्हा, जिल्हाधिकारी, आपल्या निर्यणशक्तीअनुसार त्या संलेखावर किती शुल्क आकारणीपात्र ठरेल ते शुल्क (कोणतेही असल्यास) किंवा अनुसूची एकच्या कोणत्या अनुच्छेदान्वये तो शुल्क आकारण्यास पात्र ठरेल ते निर्धारित करील.

(२) ते (४) * * * *

**३२.** ते **७६.** * * * *

**अनुसूची.** * * * *

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.**

**[ सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक २३. ]**

**[ महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. चंद्रशेखर बावनकुळे,**
महसूल मंत्री.**]**

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.